## अमेरिकेत आजपासून

# मायमराठीचा जागर

सामना
02-06-09

**विद्याधर चिंदरकर**

फिलाडेल्फिया, दि. १ - हिंदुस्थानसह जगभरातील मराठीजनांचे लक्ष लागलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या चौदाव्या जागतिक मराठी अधिवेशनाला आज फिलाडेल्फियात शानदार प्रारंभ होत आहे. शिवसेना कार्यकारी प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते होणार आहे. आषाढी एकादशीची पार्श्वभूमी आणि शिवसेनेच्या सहभागामुळे भगवामय झालेल्या या मेळ्यासाठी 'मायमराठी'चे हजारो 'वारकरी' अमेरिकेत दाखल झाले आहेत. त्यामुळे येथे मराठीचा जागरच घुमणार आहे.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचे उदघाटन**

**उद्धव ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती**



फिलाडेल्फियातील पेन्सिल्व्हानिया कन्व्हेंशन सेंटरमध्ये व्यापारी परिषदेने अधिवेशनाची सुरुवात होईल. आपल्या कर्तृत्वाचा झेंडा जगभर फडकविणाऱ्या मराठी उद्योजकांच्या यशोगाथा यावेळी कथन केल्या जातील. याशिवाय दिवसभरात विविध भरगच्च कार्यक्रम सादर होतील. *(पान ५ वर)*

■ शिवकालीन इतिहास जागणार / पान ५

## फिलामहाराष्ट्रीया

■ फिलाडेल्फियात जमलेल्या हजारो मराठीजनांमुळे या शहरातील वातावरण म्हाटमोळे झाले आहे. रस्त्यारस्त्यावर मराठी चेहरे दिसत आहेत. डिपार्टमेंटल स्टोअर्स, रिजनल रेल स्टेशन, टेप्टा बसमधून प्रवास करणारी मराठी मंडळी एकमेकांशी सहज संवाद साधत आहेत. 'नमस्कार', कोणत्या जिल्ह्यातून आलात? मुंबईत कुठे राहता?' अशी आपुलकीची विचारपूस अस्सल मराठीतून एकमेकांना केली जात आहे. त्यामुळे आपण अमेरिकेत नसून महाराष्ट्रातीलच एखाद्या बसमध्ये प्रवास करीत असल्याचा 'फिल' अनेकांना येत आहे.

---

पान ५ सामना - 02-06-09

# फिलाडेल्फियात जागणार शिवकालीन इतिहास




मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - स्वराज्याच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजीमहाराजांनी बांधलेले गडकिल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासाचा अमूल्य ठेवा. हा ठेवा फिलाडेल्फियातील अधिवेशनात भरणाऱ्या गडकिल्ल्यांच्या प्रदर्शनानिमित्ताने अमेरिकेतील मराठीजनांपुढे खुला होणार आहे. शिवसेना कार्यकारी प्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे हवाई छायाचित्रण केले होते. या मनोहारी छायाचित्रांमुळे शिवकालीन इतिहास पुन्हा एकदा जिवंत होणार आहे. अमेरिकेतील मराठी बांधवांपर्यंत शिवरायांचा इतिहास जावा तसेच किल्ल्यांचा संपूर्ण तपशील देणाऱ्या पाच हजार माहिती पुस्तिकाही अधिवेशनात वाटल्या जाणार आहेत.

### आजचे कार्यक्रम

- उद्घाटन समारंभ
- डॉ. श्रीनिवास ठाणेकर यांची यशोगाथा
- महाराष्ट्र सरकारचे निवेदन व सादरीकरण
- फिलाडेल्फिया सरकारतर्फे विविध विषयांवर सादरीकरण
- आरोग्यविषयक व्याख्याने व चर्चासत्रे
- 'दिशा मार्केटिंग'ची यशोगाथा
- श्यामराव चौधुले यांची यशोगाथा
- समारोप





शिवसेना कार्यकारी प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काढलेले मुरुड-जंजिरा आणि विजयदुर्ग किल्ल्याचे मनोहारी छायाचित्र.